दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit... Epaper Portal
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १०३ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.७ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळणार नाही म्हणजे नाही : छगन भुजबळ

## आमचा विरोध नाही, पण त्यांना स्वतंत्रपणे द्या

**पंढरपूर**–पंढरपुरात ओबीसी एल्गार मेळावा पार पडला. यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी पुन्हा एकदा मनोज जरांगे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. संपूर्ण मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळणार नाही म्हणजे नाही, असा इशारा देत जरांगेंना थेट आव्हान दिले. तर मतांसाठी तुम्ही ऐकत असाल तर ओबीसींचे देखील मतदान आहे, याचे भान ठेवा, असा इशारा देत भुजबळांनी शिंदे-फडणवीस सरकारला घरचा आहेर दिला.



भुजबळ म्हणाले की, आपले पूर्वज लढवय्ये होते, अन्याय करणाऱ्यांविरोधात आता बोललंच पाहिजे, आपण कोणावरही अन्याय करायचा नाही. आणि कोणावर अन्याय झाला तर त्यांना संरक्षण देण्यासाठी ओबीसी म्हणून उभे राहायचे आहे.आज मी पंढरपुरात आहे. आल्यावर सर्वप्रथम पांडुरंगांचे दर्शन घेतले आहे. पांडुरंग सर्व धर्माचा आहे, सर्व जातीचा आहे. संत महतांनी काय सांगितले आपण सर्व एक आहोत. देव जसा तुमचा आहे. तसा तुमचा आहे. सर्वच पक्षाचे नेते, लोक देवापुढे नतमस्तक होतात. पण नेमकं आरक्षणाच्या वेळीच का अडवले जाते. जे असे कोणी करत असतील त्यांना माझे सांगणे आहे की, तुम्ही अडवू नका.मराठा समाजाला आरक्षण द्या, पण स्वतंत्र द्या. पण जरागेंचं मात्र आम्हाला ओबीसीतूनच आरक्षण मिळाले पाहिजे, अशी मागणी केली जाते. पण लक्षात ठेवा, ओबीसीतून संपूर्ण मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही म्हणजे नाही, असा इशाराच छगन भुजबळ यांनी दिला.

यांची गरीब लेकरंबाळ मुंबईला जाणार? अन् यांची लेकरंबाळ दोनशे गाड्या घेऊन मुंबईत मैदान पाहायला जातात. अन् हे गरीब आहेत. श्रीमंती आणि गरीबीवर आरक्षण मिळत नाही. हे लक्षात घेतलं पाहिजे. सामाजिक दृष्टीने त्याकडे पाहणार आहात की नाही ?दलित, आदिवासी इतर समाजातील लोक देखील ओबीसी समाजासोबत आहे. मतांसाठी तुम्ही भाषण करत असाल तर याद राखा. ओबीसींचे देखील मत आहेत, हे देखील लक्षात घेतलं पाहिजे, असा घरचा आहेर मंत्री छगन भुजबळ यांनी दिला.छगन भुजबळ म्हणाले की, ऑफिसमधून बसून कुणबी लिहायचं आणि ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे काम सुरु आहे. खोटी प्रमाणपत्र देण्याचे काम सुरू आहे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासमोरच मी नेहमीच बोलतोय. माझी भूमिका मांडतोय. मीडियातून देखील सातत्याने सांगत आहे. एल्गार मेळाव्यातून देखील सांगतो आहे.जाळपोळ करणारे चूक आहे. गुन्हे मागे घेण्यासाठी दबाव टाकणे चूक आहे. ओबीसीतून आरक्षण मागणे देखील चूक आहे. सरसकट कुणबी प्रमाणपत्र मागणी करून ओबीसींच्या ताटातील ओढून घेणे चूकीचे आहे. हे सर्व जाऊन सांगा त्या मनोज जरांगेंना. छगन भुजबळ हा मराठ्यांच्या विरोधात नाही. जाळपोळ करणाऱ्यांविरोधात आहोत. घडवणारे आहोत. तोडफोड करणारे नाहीत.लढेंगे हर दिन हारे नही है, जितेंगे एक दिन हम मरे नही है, असा शेर म्हणत भुजबळांनी चप्पल मारण्याचा इशारा देणाऱ्यांना सुनावलं. अरे तुमच्याकडे चप्पल असेल तर माझ्या पायात बूट आहे. अजून आम्ही नामर्द झालेलो नाहीत.यांची २०० पोरं गाड्या घेऊन मुंबईत गेलीत कुठल्या मैदानावर उपोषण करायचं ते पाहण्यासाठी. सारखं आमची पोरं गरीब असं म्हटलं जातं. पण आरक्षण हे गरिबी आणि श्रीमंतीवर नाही. हे आरक्षण ज्या समाजाला काही मिळत नाही त्यांच्यासाठी नाही. त्यामुळे आरक्षण हे तुम्हाला तुम्ही श्रीमंत आहात याच्यावर नाही, तुम्ही सामाजिक दृष्ट्या किती मागलेले आहात याच्यावर अवलंबून आहे. मंत्रालयातही ५४ टक्के मराठा समाजाची माणसं आहे, असं म्हणत भुजबळांनी मनोज जरांगे यांच्यावर थेट वार केला.भुजबळांना मंत्रिपदाची पर्वा नाही. मंत्रिमंडळातही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसमोर जे बोलायचं ते बोललोय मी. त्यामुळे मतांकडे पाहून तुम्ही भाषणं करु नका मतं आमच्याकडेही आहेत. आम्ही विकास करण्यासाठी आकाश पाताळ एक करु, असं भुजबळांनी म्हटलं.

# १२५६ वनरक्षकांच्या भरतीचा मार्ग मोकळा

## सर्वोच्च न्यायालयात आव्हानित झालेली पेसा क्षेत्रातील पदे वगळून होणार वनरक्षकांची भरती

**मुंबई । प्रतिनिधी**

वनरक्षक पदाच्या भरतीच्या प्रतिक्षेत बराच काळ असलेल्या युवा उमेदवारांची प्रतिक्षा संपली असून १२५६ वनरक्षकांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर प्रक्रिया वेगात पूर्ण करण्याचे निर्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले आहेत.

एकूण २१३८ वनरक्षक पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या २१३८ वनरक्षक पदांसाठी २ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट २०२३ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने टिसीएस-आयओएन मार्फत परीक्षा घेण्यात आली होती. मात्र अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) शासकीय पदभरती प्रक्रियेस सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने सर्वच पदभरती प्रक्रिया बाधित झाली होती. त्यामुळे सर्वच भरतीच्या प्रतिक्षेत असलेल्या उमेदवारांमध्ये अस्वस्थता पसरली होती. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार हे या प्रश्नातून मार्ग काढण्याकरता सातत्याने प्रयत्नरत होते. वनमंत्र्यांच्या या सततच्या पाठपुराव्यास यश आले असून खोळंबलेल्या पदभरती प्रक्रियेस आता चालना मिळाली आहे. त्यानुसार शासनाने अनुसूचित क्षेत्र (पेसा) सोडून उर्वरित १२५६ वनरक्षक पदांची भरती करण्यास मान्यता देत मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे वनरक्षक पदभरतीच्या प्रतिक्षेत असलेल्या सुमारे चार लाख युवा उमेदवारांना दिलासा मिळाला आहे.



ऑगस्ट महिन्यात झालेल्या वनरक्षक पदभरती परीक्षेत एकूण तीन लाख ९५ हजार ७६८ परिक्षार्थींनी ऑनलाईन परीक्षा दिली होती त्यातील एकूण दोन लाख ७१ हजार ८३८ परीक्षार्थी ४५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करून पुढील भरती प्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. या पुढील भरती प्रक्रियेत टीसीएच आयओएन कडून प्राप्त गुणवत्ता यादीनुसार पात्र उमेदवारांची कागदपत्रांची छाननी,शारीरिक गुणवत्ता चाचणी,धाव चाचणी हे टप्पे पार पाडले जातील. ऑनलाईन परीक्षा आणि प्रत्यक्ष धाव चाचणी यांचे गुण एकत्र करून नवीन गुणवत्ता यादी तयार केली जाईल. या नवीन गुणवत्ता यादीनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या यादीला प्रादेशिक निवड समितीकडून मान्यता घेतल्यानंतर अंतिम टप्प्यात निवडसूचीतील उमेदवारांची २५ कि.मी. आणि १६ कि.मी. चालण्याची चाचणी घेण्यात येईल. या अंतिम चाचणीतून पात्र उमेदवार निवडून त्यातून वनरक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. ही सर्व प्रक्रिया दि.१७ जानेवारी पासून सुरू करण्यात येत असून वनवृत्तातील उमेदवार संख्येनुसार १५ दिवस ते ४४ दिवस या कालावधीत ही प्रक्रिया वनवृत्तनिहाय पूर्ण केली जाईल. सर्वात कमी उमेदवार असलेल्या अमरावती वनवृत्तात ही प्रक्रिया १५ दिवसात पूर्ण होणे अपेक्षित असून सर्वात जास्त उमेदवार असलेल्या कोल्हापूर वनवृत्तात ४४ दिवसात,त्यापाठोपाठ ठाणे आणि नागपूर वनवृत्तात ४० दिवसात तर उर्वरित चंद्रपूर,गडचिरोली,यवतमाळ,छत्रपती संभाजी नगर,धुळे,नाशिक,पुणे या वनवृत्तात प्रत्येकी २० दिवसात वनरक्षक भरती प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित आहे. या भरती प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यांची माहिती वन विभागाच्या संबंधित संकेतस्थळांवर वेळोवेळी दिली जाणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे भरतीच्या प्रतिक्षेत असलेल्या युवा उमेदवारांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# तर होऊ शकतो गौणखनीज वाहून नेणाऱ्या वाहनांना ५० हजार रुपयांपर्यंत दंड

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात कोळसा,राख,विटा,वाळू,तसेच गौण खनीजाची वाहतूक करणारे वाहन ताडपत्रीने न झाकल्यास या वाहनांना ५० हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. याबाबतचा निर्णय जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणच्या बैठकीत घेण्यात आला. या वाढीव दंडाची तरतुद १ जानेवारी २०२४ पासून सुरू झाल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांनी कळविले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात वाहनांद्वारे होणारे रस्ते अपघात टाळण्यासाठी कोळसा,राख,विटा,वाळू,आदी गौणखनीज वाहतूक करणा-या वाहनांनी सदर माल ताडपत्रीने न झाकल्यास वाहनावर परवाना निलंबनाची विभागीय व दंडनीय कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी,प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे आदी उपस्थित होते.



कोळसा,राख,विटा,वाळू,तसेच गौण खनीजाची वाहतूक करणा-या वाहनास ताडपत्री कव्हरने न झाकून वाहतूक केल्यास पहिला गुन्हा १० दिवस परवाना निलंबन किंवा १० हजार रुपये दंड,दुसरा गुन्हा २० दिवस परवाना निलंबन किंवा २० हजार रुपये दंड आणि तिसरा गुन्हा ५० दिवस परवाना निलंबन किंवा ५० हजार रुपये दंड आकारला जावू शकतो,याची सर्व वाहन मालकांनी नोंद घ्यावी,असे प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांनी कळविले आहे.

# वर्धा पोलिसांचा ई-दरबार उपक्रम पोलिस अधिकारी कर्मचाऱ्यांना दिलासा देणारा-पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

## पोलिस प्रदर्शनीचा समारोप व ई-दरबारचा शुभारंभ

**वर्धा । प्रतिनिधी**

पोलिस कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या समस्या, अडचणी कालमर्यादेत आणि विनात्रासाने सोडविण्यासाठी वर्धा पोलिसांनी सुरु केलेला ई-दरबार हा अतिशय चांगला उपक्रम आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांना याद्वारे दिलासा मिळेल, असे प्रतिपादन वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. महाराष्ट्र पोलिस दलाच्या वर्धापन दिनानिमित्त पोलिस मुख्यालयाच्या प्रांगणात दोन दिवशीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीचा समारोप व ई-दरबारचा शुभारंभ पालकमंत्री मुनगंटीवार यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खा.रामदास तडस, आ.रामदास आंबटकर, आ.दादाराव केचे, आ.डॉ. पंकज भोयर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलिस अधीक्षक नुरूल हसन, अपर पोलिस अधीक्षक डॉ.सागर कवडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बदलत्या काळात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. गुन्हेगारीला आळा







घालण्यासाठी फक्त पोलिस विभागाने काम करुन चालणार नाही तर यामध्ये सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. पोलिस विभागामध्ये सकारात्मक बदल घडून येत आहे. प्रदर्शनीमधील विविध स्टॉलच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती होणार आहे. व्यसनाधिनतेला आळा बसण्यासाठी ही प्रदर्शनी उपयुक्त ठरणार असल्याचे पुढे बोलतांना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले.पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांना आपली कामे तसेच समस्या मांडण्यासाठी मुख्यालयी यावे लागतात. ई-दरबारच्या माध्यमातून मुख्यालयी न जाता प्रश्न मार्गी लागत आहे. पोलिस अधीक्षक नुरूल हसन यांच्या संकल्पनेतून ई-दरबार हा अतिशय चांगला उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. यासाठी पालकमंत्र्यांनी पोलिस प्रशासनाचे अभिनंदन केले. यावेळी ई-दरबार माहिती पुस्तिकेचेही विमोचन करण्यात आले. वर्धा पोलिसांच्यावतीने सायबर सुरक्षा, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर यासह विविध बाबींची नागरिकांना माहिती व्हावी याकरीता प्रदर्शन लावण्यात आले होते. या प्रदर्शनीमध्ये पोलिसांचा सायबर विभाग, जलद प्रतिसाद पथक, दंगल नियंत्रण पथक, गृहरक्षक दल, अंमली पदार्थ विरोधी पथक, दामिनी पथक, वाहतूक विभाग, शस्त्र प्रदर्शनी, डॉग स्कॉड, भरोसा सेल, बिनतारी संदेश विभाग, बॉम्ब शोधक नाशक पथक यांच्यासह विविध दालने लावण्यात आली होती. यावेळी मान्यवरांनी विविध स्टॉलला भेट दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलिस अधीक्षक नुरूल हसन यांनी केले. संचलन व आभार प्रदर्शन स्मिता महाजन यांनी केले.

सह्याद्रीचा राखणदार



# भद्रावतीत आज रन फॉर महाराष्ट्र

# हजारो भद्रावतीकर धावणार









**भद्रावती शिक्षण संस्था, भद्रावती द्वारा संचलित नीळकंठराव शिंदे विज्ञान आणि कला महाविद्यालयामध्ये आज दिनांक ७ जानेवारी रोज रविवारला सकाळी ७ ते १०.३० वाजताच्या दरम्यान रन फॉर महाराष्ट्र या मॅरॅथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यापूर्वीही या संस्थेकडून 'रन फॉर युनिटी', 'रन फॉर डॉटर', 'रन फॉर फ्रेंडशिप' अशा विविध सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संकल्पना राबविण्यात आल्या. त्या यशस्वी आयोजनानंतर यावेळी सामाजिक बांधिलकी जपण्याची परंपरा कायम ठेवीत यावर्षी 'रन फॉर महाराष्ट्र' या स्पर्धेचे आयोजन केले आहे.**




भद्रावती शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव स्वर्गीय नीळकंठरावजी शिंदे यांच्या प्रेरणेने त्यांच्याच हयातीत २०१९ पासून सुरू झालेली ही स्पर्धा (२०२१ चा कोविड काळ वगळता) आजतागायात सातत्याने सुरू आहे. स्पर्धेचे हे चौथे वर्ष असून उत्तरोत्तर भद्रावती शहरात या स्पर्धेची लोकप्रियता झपाट्याने वाढत आहे. जातपात,धर्म विसरून सर्वधर्मीय जनसामान्य या स्पर्धेत धावण्यासाठी सहभागी होत आहे. उत्तरोत्तर सहभागींची संख्या वाढत आहे .पहिल्या वर्षी सातशे आठशे नागरिकांच्या सहभागातून सुरू झालेली ही स्पर्धा आता दीड ते दोन हजार स्पर्धकांच्यावर पोहचेल अशी अपेक्षा आहे. दरवर्षी स्पर्धकांचा वाढत जाणारा आकडा हा आयोजकांचा उत्साह वाढविण्यास मदत करीत आहे.

निश्चितच ही आयोजकांसाठी आनंदाची गोष्ट आहे. ही स्पर्धा सुरू करण्याचा उद्देश सांगताना संस्थाध्यक्ष डॉ. विवेक शिंदे यांनी सांगितले की, आमची संस्था सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये नेहमी सहभागी असते. आम्ही भावंड वैद्यकीय क्षेत्रामध्ये कार्यरत आहोत. वैद्यकीय क्षेत्रामध्ये मॅरॅथॉनची आवड आहे. जगातही या स्पर्धेविषयी एक विशेष आकर्षण आहे. आरोग्यासाठी लोक धावतात हे लक्षात घेत आम्ही आमच्या संस्थेमार्फत ही स्पर्धा सुरू केली. या स्पर्धेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणे, सामाजिक प्रश्नांविषयी जनजागृती निर्माण करणे हाही ही स्पर्धा आयोजन करण्यामागे आमचा हेतू आहे. शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना या स्पर्धेच्या माध्यमातून लोकांना कसं जोडता येईल हा विचार करीत आम्ही ही स्पर्धा आयोजित केलेली आहे. ती लोकांना इतकी आवडली की लोक त्यात उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. या स्पर्धांच्या माध्यमातून सामाजिक जागृतीसोबतच सामाजिक एकता देणारा संदेश देता येतो. आता ही स्पर्धा केवळ या शैक्षणिक संस्थेची राहिलेली नाही तर ती संपूर्ण भद्रावतीकरांची झालेली आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शहरातील व परिसरातील अनेक लोक स्वतःहून फोन करतात. तिच्या यशस्वी आयोजनासाठी काय मदत लागेल हे स्वतःहून विचारतात. याचा आम्हाला आयोजक म्हणून अतिशय आनंद वाटतो.या स्पर्धेच्या माध्यमातून आम्हाला एक कळले की, लोकांना जर संधी दिली तर ते चांगल्या गोष्टी निश्चितपणे स्वीकारतात. लहानांपासून जेष्ठांपर्यंत सगळे या स्पर्धेत सहभागी होतात. त्यासाठी महिन्याभरापासून ते धावण्याची तयारी करतात. दरवर्षी आम्ही स्पर्धेच्या १५ दिवसांपूर्वी मॅरॅथॉन स्पर्धेचे उद्घाटन करतो. या मॅरेथॉन स्पर्धेच्या पहिल्यावर्षी 'रन फॉर युनिटी' ही थीम होती. त्यावेळी सर्वधर्मीयांना बोलवून त्यांच्या हस्ते उद्घाटन केले. दुसऱ्या वर्षी 'रन फॉर डॉटर' ही थीम होती. त्यावेळेस ज्यांना केवळ दोन मुली आहेत अशा दांपत्याच्या हस्ते आम्ही उद्घाटन केले. तिसऱ्या वेळेस 'रन फॉर फ्रेंडशिप' ही थीम होती. त्यावेळेस गावात ज्यांची दोस्ती सुप्रसिद्ध आहे अशा जिवलग मित्रांना बोलवून त्यांच्या हस्ते उद्घाटन केले. यावेळेस 'रन फार महाराष्ट्र' ही थीम ठेवली आहे. यावेळी महाराष्ट्रातील विविध पारंपारिक वेशभूषेत येणाऱ्या स्पर्धकांच्या हस्ते आम्ही उद्घाटन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विशेष म्हणजे यावेळी विविध प्रकारचे वैविध्यपूर्ण वेष परिधान करून गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. भद्रावतीकरही उत्स्फूर्तपणे त्यात सहभागी होतील अशी अपेक्षा आहे. भद्रावतीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे आयोजकांचे बळ वाढत आहे. यापूर्वी सहभागी स्पर्धकांना एक टी-शर्ट दिले जात होते. यावर्षी सर्वांना महाराष्ट्राची ओळख असलेली टोपी भेट देणार आहे. साधारणतः ५ गटांमध्ये ही स्पर्धा होईल. यामध्ये पहिला गट लहान मुलांचा असेल, दुसरा गट महिलांचा असेल, तिसरा गट हा जनरल लोकांसाठी असेल, चौथ्या गटामध्ये महाराष्ट्रीयन विशिष्ट वेशभूषेला प्राधान्य देण्यात येईल आणि शेवटच्या गटामध्ये वय झाल्यानंतरही जे लोक धावतात अशा वयोवृद्ध लोकांचा तो गट असेल. या सर्व गटांमध्ये सहभागी विशेष प्राविण्यप्राप्त स्पर्धकांना भद्रावती शिक्षण संस्थेतर्फे सन्मानित करण्यात येणार आहे. त्यात सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शॉल, श्रीफळ यांचा समावेश असेल. ही स्पर्धा स्थानिक शिंदे कनिष्ठ महाविद्यालयापासून गौराळा गणेश मंदिर गेटपर्यंत परत तिथून त्याच मार्गाने कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत ही स्पर्धा असणार आहे. स्पर्धकांची गैरसोय होऊ नये म्हणून आयोजकांतर्फे म्बुलन्स, पाणी, एनर्जी ड्रिंकची व्यवस्था करण्यात येणार आहे. धावणाऱ्यांनी रस्त्यावर टाकलेला कचरा किंवा नागरिकांनी फेकलेला कचरा उचलण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची टीम कार्यरत असणार आहे. त्या माध्यमातून भद्रावतीकरांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला जाईल. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी भद्रावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे, सचिव डॉ. कार्तिक शिंदे, सहसचिव प्रा. विशाल शिंदे, सदस्य श्रीमती नीलिमाताई शिंदे, सेवानिवृत्त प्राचार्य मोहन पुसनाके, प्राचार्य जयंत वानखेडे, दिलीप शिंदे, सोनाली कोंडे, डॉ. वैभव शिंदे यांनी अहोरात्र परिश्रम घेतले आहे.

## यशस्वी व्यवसायासाठी चार निकष-स्तंभ आवश्यक - सुबोध कुलकर्णी




**सांगोला**-प्रत्येक युवक व युवतिनी नोकरीच्या मागे न लागता स्वतंत्र व्यवसाय करावा,त्यासाठी गुजरात पैटर्न अन्गिकरावा.व्यवसायात यशस्वी होन्यासाठी व्यवसायची निवड,आर्थिक नियोजन,दूरदृष्टी व विक्रिकौश्ल्य हे चार निकष अंगिकारणे गरजेचे आहे,असे प्रतिपादन सांगोलयतील उद्योजक सुबोध कुलकर्णी यानी केले.माता बालक प्रतिष्ठान,मिटकोन व ओन्कारा असेट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या महिलांच्या बैग ,बटवा व पर्स प्रशिक्षण वर्गाच्या पारितोषिक समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून कुलकर्णी बोलत होते.या वेळी व्यासपीठावर संस्था पदाधिकाती वसुंधरा कुलकर्णी,मिटकोन व ओन्कारा असेटचे अकबर शेख,प्रसाद तावसे,प्रशिक्षण मार्गदर्शीका रेखा कत्पे,संस्था कोषाध्यक्ष डॉ शालिनी कुलकर्णी आदि उपस्थीत होते.

सांगोला शहरातील शनी मंदिराजवळ असलेल्या संस्था इमारतीत सदर कार्यक्रम संपन्न झाला.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.नारिशाक्तीला प्रेरणा देण्यासाठी इतनी शक्ती हमे दे न दाता ही प्रार्थना सादर करण्यात आली.अकबर शेख यानी शुभेच्छा देताना बैग,पर्स,बटवे यासारख्या प्रशिक्षण वर्गची आणखी गरज असुन सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.प्रसाद तावसे यानी कागदपत्र व कर्ज मिळवण्यासाठी मार्गदर्शन केले.प्रशिक्षण मार्गदर्शीका रेखा करपे व माजी प्रशिक्षणार्थी व उद्योजक सोनाली गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.यावेळी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या विद्यार्थिनीना प्रशस्ती पत्रकांचे वाटप करण्यात आले.या वेळी प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनीनी मनोगत व्यक्त केले. उपस्थीत पत्रकारांचा पत्रकार दिनाचे औचित्य साधून सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अश्विनी कुलकर्णी,पाहुण्याचा परिचय वर्षा राऊत,सुत्रसंचालन संध्या शास्त्री व आभार प्रदर्शन निता लाटणे यानी केले.

## मतदार संघातील ८ रस्त्यांसाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतुन २५ कोटी ६६ लक्ष रुपयाचा निधी मंजूर

### क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांची माहिति

**उदगीर :** उदगीर जळकोट मतदार संघातील अनेक गावे गेल्या कित्येक वर्षापासून रस्त्यापासुन वंचित होते. त्यामुळे तेथील ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत होती तर काही रस्त्यांची दुर्दशा झाल्यामुळे अपघात होत होते ही बाब नामदार संजय बनसोडे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून अनेक वाडी, तांडे व गावे विकासापासून दूर होते त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनदरबारी मागणी करुन कोट्यावधी रुपयाचा निधीची तरतुद करुन तो निधी मंजूर करुन घेतला. गेल्या कित्येक वर्षात अनेक लोकप्रतिनिधी होऊन गेले पण छोट्या गावात व वाडी तांड्यावर कोणीच लक्ष दिले नव्हते मात्र मतदार संघातील एका एका गावात अनेकवेळा जावुन नागरीकांच्या अडचणी समजून घेत असतात. आज मतदार संघातील ८ रस्त्यांसाठी

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा - २ संशोधन व विकास अंतर्गत ग्राम विकास विभागातुन २५ कोटी ६६ लक्ष रुपयाचा निधी मंजूर करुन घेतल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे.यामध्ये उदगीर तालुक्यातील दावणगाव ते येणकी ( जऊळ- ६३) या ४.७ कि.मी. रस्त्यासाठी ४ कोटी ४६ लक्ष रु., प्रजिमा -३१ ते आडोळतांडा रस्ता (तठ-७०) या २.२ कि.मी. रस्त्यासाठी २ कोटी ६० लक्ष रु., राष्ट्रीय महामार्ग - ६३ बोरताळातांडा टिकाराम तांडा मारुती तांडा रस्ता



(तठ-३२) या २.४ कि.मी रस्त्यासाठी २ कोटी ४६ लक्ष रु., जळकोट तालुक्यातील मरसांगवी ते चतरुतांडा रावणकोळा रस्ता (तठ-३०) या ३.९ कि.मी. रस्त्यासाठी ४ कोटी २२ लक्ष रु., राज्यमार्ग २६८ ते धोंडवाडी ते धर्मातांडा रुपला तांडा रस्ता (तठ-४२, ४७) या ४.८ कि.मी. रस्त्यासाठी ५ कोटी ४७ लक्ष रु.,

इजिमा - ५४ ते जिल्हा सरहद्द दापका रस्ता ( तठ-२६) २.७ कि.मी. च्या रस्त्यासाठी २ कोटी ९७ लक्ष रु., इजिमा - ५४ ते जळकोट तांडा रस्ता (तठ-२४) या २.७ कि.मी. च्या रस्त्यासाठी २ कोटी ३७ लक्ष रु. तर राज्यमार्ग २५१ ते उमरगा रेती रस्ता (तठ-३) या १.२ कि.मी. च्या रस्त्यासाठी १ कोटी ८ लक्ष रुपये अशा एकुण २४.८ कि.मी. च्या ८ रस्त्यांसाठी २५ कोटी ६६ लक्ष रुपयाचा निधी मंजूर केल्याने राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे यांचे मतदार संघातील नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

## महाराष्ट्राच्या विरोधात जमिनी काढून घेण्याची सहकार चळवळ सुरू; गुजरातचा महाराष्ट्रावर डोळा-राज ठाकरे

**रायगड**-महाराष्ट्रातील सर्व बाहेर नेण्यात येत आहेत. बाहेरचे लोक महाराष्ट्रात आपल्याच जमिनी किरकोळ किमतीत विकत घेत आहेत. आपल्या जमिनी काढून घेण्याची एक प्रकारची सहकार चळवळ महाराष्ट्राच्या विरोधात चालवली जात आहे. महाराष्ट्र एकसंघ राहू नये, यासाठी बाहेरच्या लोकांचे प्रयत्न सुरू आहेत आणि आपले नेते मिंधे, लाचार व पैशाने वेडे झाले आहेत, असा घाणाघात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्षांतर करणाऱ्या नेत्यांवर केला आहे.दरम्यान पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, महानंद डेअरी अमूल गिळकृत करतंय की काय असा सवाल उपस्थित झाला आहे. महाराष्ट्रात सहकार क्षेत्र चालविण्यासाठी सक्षम माणसे आहेत. महात्मा फुले यांनी खरी सहकार चळवळ उभी केली. त्यांनी जमीनी जाऊ नये म्हणून पहिले आंदोलन केले.



## स्नेहसंमेलनातून होतो विविध कलागुणांचा उत्कर्ष- कवी सुनील जवंजाळ

**वाटंबरे । प्रतिनिधी**

शालेय जीवनात विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंतरंगातल्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे विविध शाळा महाविद्यालयात होणाऱ्या स्नेहसंमेलनातून समाजाच्या उन्नतीसाठी विविध कलाकारांची निर्मिती होत असते. व्यक्तिमत्व विकासाच्या जडणघडणीत स्नेहसंमेलनाचा सर्वात मोठा वाटा असतो जीवनाच्या रंगमंचावर कसं जगायचं याचं सामर्थ्य स्नेहसंमेलनातून येत असतं. अशा स्नेहसंमेलनातूनच विविध कला गुणांचा उत्कर्ष होत असतो असे प्रतिपादन ग्रामीण साहित्यिक प्रसिद्ध वक्ते व कवी सुनील जवंजाळ यांनी केले जीवन शिक्षण प्रसारक मंडळ वाटंबरे संचलित श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज वाटंबरे येथे आयोजित केलेल्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष जीवन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मोहन पवार, प्रमुख उपस्थिती कवी ज्ञानेश डोंगरे,मुख्याध्यापिका नीता पवार, पर्यवेक्षक राजेश शिवशरण,ज्येष्ठ नागरिक महादेव पवार, बाबासाहेब पवार.डॉ.दबडे, स्नेहसंमेलन प्रमुख ज्ञानेश्वर मिसाळ,हनुमंत निकम, जनरल सेक्रेटरी शिवतेज पवार गौरी पवार शिक्षक दिनाचे मुख्याध्यापक वैभव माने प्राचार्य शितल पवार विद्यार्थिनी प्रतिनिधी सृष्टी काशीद विद्यार्थी प्रतिनिधी रसिका काटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना कवी जवंजाळ म्हणाले की चार भिंतीच्या वर्गातले शिक्षण म्हणजे शिक्षण नव्हे तर वर्गातल्या शिक्षणाचा समाजात कशा पद्धतीने उपयोग होतो त्याला शिक्षण म्हणतात कवितेच्या चार ओळी तुम्हाला चार गुण देतील पण त्याच चार ओळी जर जगण्यात आत्मसात केल्या तर जीवनात अनेक गुणांची भर पडेल आपलं व्यक्तिमत्व अष्टपैलू बनवण्यासाठी विविध प्रकारची पुस्तके व मैदानावरच्या खेळांशी मैत्री करा जगणं जिंकायचं असेल तर आपल्या ध्येयाशी प्रामाणिक रहा. यावेळी त्यांनी विविध प्रकारच्या प्रसंगातून व कवितेतून विद्यार्थ्यांच्या मनोरंजनाबरोबरच समाजाचे वास्तव मांडले. यावेळी विविध देणगीदारांचे सत्कार करण्यात आले.त्याचबरोबर पाचवी ते बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांना विविध देणगीदारांनी दिलेल्या रोख रकमेसह डॉ. दबडे यांच्याकडून सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आदर्श विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थिनींनी गायलेल्या स्वागत गीत गायले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्राचार्य नीता पवार यांनी शाळेच्या उत्कर्षाचा आलेख मांडत विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम कसे राबवले जातात याबद्दलची माहिती दिली. कै दा.सू.पवार यांच्या जीवनावर लिहिलेली कविता व इतर दोन कविता कवी ज्ञानेश डोंगरे यांनी सादर केल्या. प्रमुख पाहुण्यांची ओळख पर्यवेक्षक राजेश शिवशरण यांनी करून दिली. यावेळी अहवाल वाचन डी.एम.मिसाळ यांनी केले, अहवाल वाचनातून वर्षभर राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत देणगीदारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.तानाजी खंडागळे यांनी केले तर मुख्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पिंटू पवार सर व सत्यभामा मिसाळ मॅडम यांनी केले. उपस्थितांचे आभार हणमंत पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मधील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कवी डोंगरे सर यांनी गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# जिल्ह्यातील पत्रकार व कुटुंबियांसाठी महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिर संपन्न

## पत्रकारांच्या मागण्या सकारात्मक दृष्टीने सोडवू – जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे

## मोफत आरोग्य सुविधा देऊ, पत्रकारांचे सर्व प्रश्न मार्गी लावू–आ.डॉ.राहुल पाटील

**परभणी । प्रतिनिधी**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करणाजया पत्रकारांचे विविध प्रश्न असून जिल्हास्तरावरील प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन सकारात्मक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले. जिल्ह्यातील सर्व पत्रकार, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचे प्रतिनिधी,वेब पत्रकार व छायाचित्रकार यांच्या कुटुंबियांसाठी आर.पी. हॉस्पीटल व रिसर्च सेंटर व व्हॉईस ऑफ मिडीया संघटना परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने दर्पण दिना निमित्त महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिर शुक्रवार दि.५ रोजी पाथरी रस्त्यावरील आर.पी.हॉस्पिटल (परभणी मेडीकल कॉलेज) येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री.गावडे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी आमदार डॉ.राहुल पाटील होते. व्यासपीठावर पोलिस अधीक्षक रागसुधा आर.,परभणी मेडीकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे, शिवसेना सह संपर्कप्रमुख डॉ.विवेक नावंदर, व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य कार्यवाह सुरज कदम, मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया, उपाध्यक्ष विशाल माने, जिल्हाध्यक्ष गजानन देशमुख, प्रवीण चौधरी, ज्येष्ठ पत्रकार रमाकांत कुलकर्णी, प्रवीण देशपांडे, शिवसेना माजी उपजिल्हाप्रमुख संजय गाडगे, शिवसेना माजी शहरप्रमुख अनिल डहाळे, माजी नगरसेवक नवनीत पाचपोर, करण पाटील, वाजीद आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी गावडे म्हणाले, परभणी मेडिकल कॉलेजचे इन्फ्रास्ट्रक्चर उच्च दर्जाचे झाले असून ही संस्था इमारत परभणीच्या वैभवात भर टाकणारी आहे, असे सांगितले. याठिकाणी आधुनिक पद्धतीच्या आरोग्य सुविधा मिळतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आरोग्याबाबत सर्वांनी सकारात्मक राहिले पाहिजे. विशेषत: पत्रकारांनी स्वत:च्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारण कुठलाही आजार कधीही जडू शकतो, मुळात आजारच होवू नये म्हणून काळजी घ्यावी. ध्यान धारणा करावी, त्यातून वेगळी ऊर्जा मिळते. पत्रकारांच्या मागण्यांसंदर्भात बोलताना जिल्हाधिकारी गावडे म्हणाले, पत्रकार भवनासाठी जागेचा प्रश्न सोडवण्यासाठी लवकरच संबधित विभागाची बैठक घेऊ आणि कालावधी निश्चित करून टप्पा निहाय काम करू, असे आश्वासन श्री.गावडे यांनी दिले. आ.डॉ.पाटील यांनी आपल्या भाषणात व्हॉईस ऑफ मीडियाच्या वाटचालीचा गौरवपूर्ण उल्लेख करीत ही संघटना सामाजिक प्रश्नावर चांगले काम करीत असल्याचे सांगितले. मात्र पत्रकारांना काम करतांना



कुठलीही सुरक्षितता नाही, त्यांना कुठेतरी मदतीचा हात मिळाला पाहिजे, सुरक्षितता मिळाली पाहिजे. पत्रकारांसाठी दरवर्षी मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्याबरोबरच आरोग्य कार्ड देवून वर्षभर सर्व तपासण्या मोफत करण्यात येतील, अशी घोषणा देखील आ. पाटील यांनी यावेळी केली. पत्रकार भवनासाठी आपण २५ लाखाचा निधी देणार असून यापूर्वीच याची घोषणा केलेली आहे. त्या कार्यक्रमाला मनपा आयुक्त देखील होत्या, परंतु त्याबाबत त्यांच्याकडून अद्याप कुठलीही कार्यवाही झाली नसून जागा देखील निश्चित झालेली नाही. याबाबत जिल्हाधिकारी यांनी मनपा प्रशासनासोबत बैठक घेवून चांगली जागा उपलब्ध करून द्यावी. पत्रकारांच्या घरांसाठी महसूल प्रशासनाने ५ एकर जागा दिल्यास चांगली हाउसिंग सोसायटी देखील उभी राहू शकेल. जिल्हा कचेरीत पत्रकार कक्ष स्थापन करावा,असेही ते म्हणाले. लोकप्रतिनिधी, अधिकारी म्हणून आपल्याला लोकांची सेवा करण्याची संधी मिळाली आहे, ती वाया घालवता कामा नये. भविष्यात मराठवाड्यातील सर्वात मोठे कॅन्सर युनिट इथे उभारण्यात येणार आहे. डायलेसिस युनिट उपलब्ध करून देण्यात आले असून त्याचा गरजू रुग्णांना निश्चितच लाभ होईल, असे आ. पाटील यांनी यावेळी सांगितले. पोलिस अधीक्षक रागसुधा आर म्हणाल्या की, पोलिस आणि पत्रकार यांच्या कामात खूप साम्य असल्याचे सांगून त्यांनी वर्षातून एकदा स्वत:ची व कुटुंबीयांची आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.व्हॉईस ऑफ मीडिया च्या वतीने गणेश पाटील, शेख गौसोद्दीन शहाबोद्दीन, सोमनाथ स्वामी, आनंद ढोणे, लक्ष्मण उजागरे यांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक किटचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष गजानन देशमुख यांनी केले. विजय चोरडिया, सूरज कदम यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन गणेश पाटील तर आभार प्रदर्शन कैलास चव्हाण यांनी केले.महाआरोग्य तपासणी शिबिराची सुरूवात सकाळी ७ वाजल्यापासून झाली. पत्रकारांसह त्यांच्या कुटुंबियांसाठी प्रथमच अशा प्रकारच्या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या महाआरोग्य शिबिरात ३९२ पत्रकार, इलेट्रॉनिक्स मिडीया प्रतिनिधी, वेब पत्रकार, छायाचित्रकार आणि पत्रकारांच्या कुटुंबीयांच्या मोफत तपासण्या करण्यात आल्या. यामध्ये लिपिड प्रोफाईल शुगर, बीपी हृदयरोग, कोलेस्ट्रॉल, दात,कान, नाक, घसा, डोळे, हाडे (एक्सरे), हाडातील कॅल्शियम, त्वचा, खाज, थॉयराईड इत्यादी तपासण्या केल्या महिलांशी संबंधित टिएफटी हार्मोन चेंजेस, पीसीओडी, पोटाचे विकार, शरीरावरील गाठी इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. तसेच लहान मुलांच्या आरोग्याची देखील तपासणी करण्यात आली.

# हिंगोली लोकसभेवर ऐतीहासिक विजयोत्सवसाठी भाजपा तयार–रामदास पाटील सुमठाणकर(लोकसभा प्रभारी)

**सेनगाव । प्रतिनिधी**

हिंगोली लोकसभा क्षेत्रात पक्षाचे संघटन बूथ–पन्ना स्तरापर्यंत मजबूत झाले असून आगामी लोकसभा सर्वत्रिक निवडणूकित भाजपचा उमेदवार निवडून येईल आणि २०१९ चा यशाचा विक्रम २०२४ ला मतदार राजा मोडीत काढून अबकी बार–४०० पार करतील असा विश्वास रामदास पाटील सुमठाणकर यांनी केला.

भारतीय जनता पार्टी आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मागील ३ वर्षांपासून लोकसभा प्रवास योजनेच्या माध्यमातून सक्षमपने तयारीला लागली असून हिंगोली,कळमनुरी वसमत,किनवट, उमरखेड आणि हदगाव या ६ विधानसभा क्षेत्रात १९९० बूथ प्रमुख ४५३ शक्तिकेंद्र प्रमुख आणि ७१४ सुपर वॉरियर्स च्या माध्यमातून हिंगोली लोकसभा मतदारसंघात पक्ष संघटन मजबूत झालेले आहे.सुपर वॉरियर्सच्या माध्यमातून सूक्ष्मपणे बूथ बांधणी केली असून प्रत्येक बूथ वर ५१% पेक्षा जास्त मतदान घेण्याचं लक्ष निर्धारित केलं आहे.त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या व्हूवरचणा



आखत विजयासाठी सर्वोतोपरी प्रयत्न अंतिम टप्प्यात आले आहेत असे रामदास पाटील यांनी सांगितले.

हिंगोली लोकसभा क्षेत्रात प्रभावी व्यक्तिमत्वच्या भेटी गाठींचा वेग वाढला असल्याने सामान्य व्यक्ती ही निवडणूक मोडवर आल्याचे चित्र मतदारसंघात बघायला मिळत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या केंद्रीय मंत्री,वरिष्ठ नेत्यांच्या सतत प्रवास होत असून आढावा बैठका पार पडत आहेत.यातूनच महायुती मध्ये हिंगोलीची जागा जर भाजपला संधी मिळाली तर आम्ही पूर्ण ताकतीने लढून विक्रमी मताने निवडून आणू अशी ग्वाही रामदास पाटील यांनी दिली.

# श्रीराम हरपाळे यांनी माझ्या स्वप्नातील भारत या विषयावर विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले



**दानापूर । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथे सरस्वती इंग्लिश स्कूल व सरस्वती विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना महाराष्ट्र भूषण ज्येष्ठ लेखक व विधी तज्ञ श्रीराम हरपाळे सर यांनी विद्यार्थ्यांना सखोल व्याख्यान दिले, याप्रसंगी शाळेचे उपाध्यक्ष श्री रावसाहेब देशमुख, विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी एन एम लोखंडे सर, ह भ प विष्णु महाराज सास्ते, व दोन्ही माध्यमाचे प्राचार्य श्री खंडाळकर सर, गोरे सर, उपमुख्याध्यापक मनोज सर, पालक मंडळी, विद्यार्थी शाळेचा पूर्ण स्टॉप यांच्या उपस्थितीमध्ये हा व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला..

# बीड येथील ऐतिहासिक ईदगाह मैदानाचे सुशोभीकरण करणार

## राष्ट्रवादी कॉँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागरांची शिष्टमंडळाला ग्वाही

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील ऐतिहासिक ईदगाह मैदानाचे सुशोभीकरण करणार असल्याची ग्वाही राष्ट्रवादी कॉँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे.

शहरातील सर्व भागातील मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी (दि.५) भेट घेत निवेदन दिले. निवेदनात म्हटले की, दरवर्षी शहरातील पेठ बीड भागातील ऐतिहासिक असणार्या ईदगाह मैदानावर ईदनिमित्त नमाज पठण करण्यासाठी लाखो लोक एकत्र येतात. त्यांना नमाज पठण करण्यासाठी कॉँक्रीट प्लॅटफॉर्म तयार करणे, सुशोभीकरण करणे, विविध सुविधा उपलब्ध करणे, अद्ययावत विविध विकासकामे करणे आवश्यक आहे. तसेच सिमेंट रस्ते व नाली बांधकाम, अल्पसंख्याक भागातील नाले बांधकाम, कब्रस्तानला सरंक्षक भिंत बांधकाम करणे, शादीखाना अशा विविध कामांची मागणी निवेदनाद्वारे



करण्यात आली. सर्व मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शासन दरबारी पाठपुरावा करत लवकरच प्रश्न मार्गी लावू व दर्जेदार कामे करू, अशी ग्वाही दिली. यावेळी मौलाना सबदर साहाब, हाफीज नजीर साहाब, ज्येष्ठ नगरसेवक सादेक जमा, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष एकबाल शेख, जैतुल्ला खान, सय्यद इलियास, मुन्ना इनामदार, सर्फराज शेख, नसीर अन्सारी, ए.वन.मुजीब, आमेर सिद्दीकी, नबिल जमा, जावेद खान, जुबेर खान, अहेमद सिद्दीकी, युनूस खान, माजेद कुरेशी, हामेद चाउस आदी उपस्थित होते.राज्य शासनाच्या अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत बीड शहरासाठी ३ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे. ग्रामीण व शहरी भागात अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी लवकरच कोट्यवधींचा निधी मिळणार आहे. त्यामुळे अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील विकासाचे बहुतांश प्रश्न मार्गी लागणार आहे.

## बीड जिल्हा भाजपा कार्यकारणी बैठक संपन्न

# आगामी लोकसभा निवडणुकित विक्रमी विजयासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे - संजय कौडगे

**बीड । प्रतिनिधी**

महाविजय २०२४ आगामी लोकसभा निवडणुकीत विक्रमी विजयासाठी राज्यभरात भारतीय जनता पार्टी कामाला लागली आहे. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी आपल्या नऊ वर्षाच्या कारकीर्तीत अतुलनीय कामगिरी केली आहे. विविध योजनेतून मोदींचे काम घराघरात पोहचले आहे. मोदींच्या विजयाची हॅट्रिक निश्चित असून या विजयात प्रत्येकाचा वाटा असावा. बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचा बालेकिल्ला आगामी लोकसभा निवडणुकीत पुन्हा एकदा विक्रमी विजयासाठी कार्यकर्त्यांनी झोकुन देऊन कामाला लागावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे यांनी जिल्हा कार्यकारणी बैठकी दरम्यान केले.

आज संघर्षयोध्दा भाजपा जनसंपर्क कार्यालय बीड येथे भाजपा मराठवाडा संघटन मंत्री मा.संजयजी कौडगे, बीड जिल्हा प्रभारी मा.डॉ. अजित गोपछडे, प्रदेश सचिव मा.प्रा.किरण पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष मा. राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा जिल्हा कार्यकारिणी बैठक संपन्न



झाली. या बैठकीत पंतप्रधान विश्वकर्मा योजना, नमो चषक क्रीडा स्पर्धा, बूथ सशक्तीकरण, मतदार नोंदणी, नमो ब्रांड अंबेसेडर, राम मंदिर लोकार्पण सोहळा आदि कार्यक्रमाचे आयोजन व संघटनात्मक कामाचा आढावा घेण्यात आला.या बैठकीस जिल्हा पदाधिकारी जिल्हा सरचिटणीस ड. सर्जेराव तांदळे, प्रा देविदास नागरगोजे, चंद्रकांत फड, नवनाथ शिराळे, अशोक लोढा, ड.सुधीर घुमरे, विक्रांत हजारी, बंडू बारगजे, राजेंद्र राक्षसभुवनकर, ब्रह्मदेव धुरंदरे, मीराताई गांधले, शिवाजीराव मायकर, दुष्यंत डोंगरे, अजय धोंडे, अजय सवाई, सलीम जहांगीर,मंडल अध्यक्ष प्रकाश सुरवसे, भगवानराव केदार, बालाजी पवार, सुरेश उगलमुगले, अनिल चांदणे, इर्शाद भाई, किरण बांगर, मुरलीधर ढाकणे, विस्तारक सर्वश्री बाबासाहेब आगे, दयावान मुंडे, राहुल जोगदंड, हरीश खाडे, रमेश शेंडगे, ईश्वर पवार, प्रमोद रामदासी, राजू शहाणे, यांचे सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठा आरक्षण मिळावे यासाठी गंगाधर काळकुटे यांनी वाढदिवसानिमित्त जिल्हा कचेरी समोर केले लाक्षणिक उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक गंगाधर काळकुटे यांनी मराठा आरक्षण प्रश्न लक्षात घेऊन स्वत:च्या वाढदिवसानिमित्त केले एक दिवशी लाक्षणिक उपोषण. त्यांनी वाढदिवसाच्या दिवशी कुठलाही हारतुरा शाल सत्कार स्वीकारला नाही. त्यांनी एक लक्षवेधी आगळे वेगळे मराठा आरक्षण मिळावे यासाठी आंदोलन केले आहे. मनोज जरांगे पाटील आणि मराठा समाजाने हाती घेतलेला मराठा आरक्षणाचा लढा अंतिम टप्प्यात आहे तसेच यासाठी माझ्या शेकडो बांधवांनी आपले जीव गमावले आहेत. बलिदान दिले आहेत, मराठा समाजातील अनेक जणांचे घरं रस्त्यावर आले असून एकीकडे आरक्षणाची अपेक्षा तर दुसरीकडे बांधवांनी आत्महत्या केल्याचे दुःख आहे. अशा वातावरणात दि.०५ जानेवारी रोजी असलेला वाढदिवस साजरा करणे मनाला पटत नाही. यामुळे यावेळी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. समाज उपयोगी उपक्रम घेतले तर, हरकत नसावी आणि मी सत्कार घेणार नाही तसेही मी आरक्षण लढा सुरू झाल्यापासून सत्कार घेत नाही पण वाढदिवसाच्या निमित्ताने सहाकरी आग्रह करतात म्हणून हे नमूद केले आहे आणि केक पण कापणार नाही. तसेच आज सकाळी १० वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे मराठा आरक्षण मिळण्यासाठी वाढदिवसाच्या निमित्ताने एक दिवशीय लाक्षणिक उपोषण केले आहे . गंगाधर काळकटे पाटील यांच्या उपोषण स्थळाला सकाळपासूनच अनेक मान्यवरासह मराठा बांधवांनी भेट देऊन पाठिंबा दर्शवला आहे. या अनोख्या मराठा आरक्षण आंदोलनाची चर्चा संपूर्ण जिल्हाभर व महाराष्ट्रभर होत आहे..



# ना.मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेत जिल्हा नियोजन समितीची बैठक

## शिवराज्यभिषेकानिमित्त प्रत्येक तालुक्यात अद्यावत व्यायामशाळा निर्माण करा-पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

**वर्धा । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे ३५० वे शिवराज्यभिषेक वर्ष आपण राज्यभर साजरे करतो आहे. यावर्षानिमित्त जिल्हा व तालुकास्तरावर प्रत्येकी एक याप्रमाणे अद्यावत व्यायामशाळा निर्माण करा. या व्यायामशाळांना छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव द्या, यासाठी प्रत्येकी दिड कोटी रुपयांचा निधी जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध करून देऊ, असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.जिल्हा परिषदेच्या सिंधुताई सपकाळ सभागृहात पालकत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीला खा.रामदास तडस, आ.रामदास आंबटकर, आ.रणजित कांबळे, आ.डॉ.पंकज भोयर, आ.दादाराव केचे, आ.समीर कुणावार, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, अप्पर जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ.सागर कवळे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरूद्ध राजुरवार, जिल्हा नियोजन समितीचे अशासकीय सदस्य यांच्यासह सर्व विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते.व्यायामशाळा बांधकामाला खर्चाची मर्यादा आहे. त्यासाठी शासन निर्णयात आवश्यक बदल करू. क्रीडा व बांधकाम विभागाने व्यायामशाळेसाठी प्रस्ताव सादर करावे. पुढील टप्प्यात मोठ्या ग्रामपंचायतींच्या ठिकाणी प्रत्येकी २५ लक्ष रुपये खर्चाच्या व्यायामशाळांचे बांधकाम हाती घेण्याचे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत दिले.सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी शासनाने २४१ कोटी रुपयांची आर्थिक मर्यादा कळविलेली आहे. या मर्यादेत विभागांकडून आलेल्या प्रस्तावांची छाणणी करून आराखडा तयार करण्यात आला. काही विभागांना निधी देणे गरजेचे असल्याने बैठकीत ना . मुनगंटीवार यांनी ३५७ कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजूरी दिली. हा आराखडा मान्यतेसाठी शासनास पाठविण्यात येणार आहे. त्यात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना ३०० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ४३ कोटी व आदिवासी उपयोजना १४ कोटी रुपयांचा समावेश आहे. शाळांना शौचालये, सुरक्षाभिंत या प्राधान्याच्या बाबी आहेत. जिल्ह्यात ज्या शाळांना सुरक्षाभिंत नाही अशा ४६ शाळांचे खर्चासह प्रस्ताव करा. यासाठी जो निधी लागेल तेवढा निधी वार्षिक योजनेतून वाढवून देऊ. औद्योगिक प्रशिक्षण संस्था युवकांना रोजगार देणाऱ्या संस्था आहे. या संस्थांमधून कुशल मनुष्यबळ आणि चांगला रोजगार उपलब्ध होईल, यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून देण्यात येतील.आपत्कालीन प्रसंगी कार्डियाक म्बूलन्स उपलब्ध असणे फार महत्वाचे आहे. या म्बूलन्स खरेदीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊ. बरेचदा रुग्णवाहिकांसाठी डिझेलचा प्रश्न निर्माण होतो. यासाठी खनिज विकास निधीतून निधी देता येईल, याची शक्यता तपासण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या.




कोणत्याही परिस्थितीत रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णवाहिकेत डिझल भरावे लागू नये, याची दक्षता घेण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी आरोग्य विभागाला दिले.जिल्ह्यात गावोगावी हॅन्डपंप आहेत, परंतू दुरुस्तीचे एकच पथक असल्याने हॅन्डपंप अनेक दिवस नादुरुस्त राहतात. त्यामुळे दुरुस्तीचे पथक वाढविण्यात यावे. कोणत्याही स्थितीती २४ तासाच्या आत दुरुस्ती झाली पाहिजे. यासाठी मनुष्यबळ उपलब्ध नसल्यास पुरुष बचत गटांना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून कंत्राटी तत्वावर काम करुन घेण्यात यावे.जिल्हा वार्षिक योजनेची कामे कालमर्यादेत झाली पाहिजे. कामांचा दर्जा उत्तम असावा, यासाठी विभागांनी विशेष काळजी घ्यावी. काही नाविन्यपुर्ण बाबींसाठी निधीची मागणी असल्यास तसे प्रस्ताव द्या, निधी उपलब्ध करून देण्यात येतील, परंतू निधी वेळेत आणि योग्य प्रकारे खर्च झाला पाहिजे, असे निर्देश पालकमंत्र्यांनी बैठकीत दिले. सुरुवातीस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पालकमंत्री व मान्यवरांचे स्वागत केले. जिल्हा वार्षिक योजनेचा प्रारुप आराखडा व यावर्षातील खर्चाची माहिती दिली. यावेळी पालकमंत्र्यांच्याहस्ते जिल्हा सांख्यिकी कार्यालयाने तयार केलेल्या जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक समालोचन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. खा.रामदास तडस व आमदारांनी बैठकीत विविध विषयांवर चर्चा केली.

### पर्यटन, तिर्थक्षेत्र, आरोग्य केंद्र, उपकेंद्रांना मान्यता

**पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत क वर्ग पर्यटन क्षेत्र, तिर्थक्षेत्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रांना मान्यता देण्यात आली. क वर्ग पर्यटन क्षेत्रामध्ये आयटीआय टेकडी ऑक्सिजन पार्क व आयटीआय टेकडी उमरी मेघेचा समावेश आहे. तिर्थक्षेत्रामध्ये विश्वशांती धाम श्री.संत सयाजी महाराज देवस्थान येळाकेळी, विठ्ठल रुखमाई व हनुमाम मंदीर देवस्थान कानकाटी, श्री.खाकीसाहेब देवस्थान सोरटा, संत गजानन महाराज मंदीर म्हसाळा, पीरचांद शहा अली ट्रस्ट समिती गवंडी, श्रीसाई बाबा देवस्थान आंजी मोठी, श्री. हनुमान चॅरिटेबल ट्रस्ट भिसनूरचा समावेश आहे. वाढोणा, कानकाटी व शेकापूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व मोहगाव, निमसडा, हळदगाव येथे उपकेंद्र प्रस्ताव मंजूर करण्यात आला.**

## सुधिरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र राजुराच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

### देशसेवा आणि समाजसेवेच्या जाणिवेतून दर्पणसारख्या नियतकालिकाचा जन्म-माजी जि.प.अध्यक्ष देवराव भोंगळे




**राजुरा । प्रतिनिधी**

सुधिरभाऊ सेवा केंद्र व देवराव भोंगळे राजुरा विधानसभा निवडणूक प्रमुख जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने येथिल कार्यालयात पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी देवराव भोंगळे यांनी सांगितले की, जगभरात घडलेली प्रत्येक घटना आपल्याला टिव्ही, वृत्तपत्रातून जनतेपर्यंत पोहचविणारे पत्रकार रात्रंदिवस मेहनत करुण ती माहिती जनतेपर्यंत पोहचवित असतात. इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीच्या काळातील एक उच्चविद्याविभूषित, पंडिती व्यक्तीमत्व असलेल्या बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पन या वृत्तपत्राव्दारे मराठी भाषेतील पत्रकारीतेची मुहूर्तमेढ रोवली. देशसेवा आणि समाजसेवेच्या जाणिवेतून दर्पणसारख्या नयतकालिकाचा जन्म झाला, मराठी समाजमन घडविण्यात बाळशास्त्री जांभेकर यांचा मोठा वाटा आहे. म्हणून त्यांच्या जन्मदिनी ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केल्या जात असल्याचे मत व्यक्त केले.राजुरा येथे सुरु असलेल्या सुधिरभाऊ सेवा केंद्र व देवराव भोंगळे राजुरा विधानसभा निवडणूक प्रमुख जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने येथिल कार्यालयात सकाळी ११ वाजता राजुऱ्यातील पत्रकारांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी देवराव भोंगळे माजी अध्यक्ष जिल्हा परीषद चंद्रपूर हे होते तर प्रमुख पाहुणे विनायक देशमुख, विनोद नरेंदुरवार उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी सांगितले की, सामाजिक बांधिलकी आणि समाजसेवा म्हणून निर्भिड व संयमपणे उन, वारा पाऊस, थंडीतही वेळेचे बंधन न पाळता रात्रंदिवस आपणापर्यंत बातम्यांचा अखंड स्त्रोत पोहचविण्याचे कार्य करणाऱ्या सर्व पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.यावेळी पत्रकार बांधवांनी बदलत असलेली पत्रकारीता आणि पत्रकारांसमोर असलेली आव्हाने याविषयी आपले मत व्यक्त करीत राजुरा विधानसभा क्षेत्रात पहिल्यांदा एवढ्यामोठ्या प्रमाणात पत्रकारांचा सत्कार सोहळा घेतल्याबद्दल भोंगळे यांचे आभार मानले. या सत्कार सोहळ्यात तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. बी. यु. बोर्डेवार, राजुरा पत्रकार असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकृष्ण गोरे, सुरेश साळवे, डॉ. उमाकांत धोटे, मसूद अहमद, बाबा बेग, एजाज अहमद, अनिल बाळसराफ, गणेश बेले, बादल बेले, सागर भटपल्लीवार, संतोष कुंदोजवार, सय्यद जाकीर, मंगेश श्रीराम, बंडू वनकर, मनोज आत्राम, आनंद चलाख, फारुख शेख, प्रफुल शेंडे, साहिल सोळंके, शाहनवाज कुरेशी, प्रविण देशकर, मिलींद देशकर, उमेश मारशेट्टीवार, मुखरु सेलोटे, मंगेश बोरकुटे, दिपक शर्मा, रंगराव कुळसंगे, रत्नाकर पायपरे, विजय जुल्मे यांचा समावेश होता.

## घराची भिंत कोसळली विधवा मजूर महिलेचा जगण्यासाठी संघर्ष

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील मोची गल्ली भागात राहणाऱ्या सत्यभामा राजकुमार परदेशी (वय ७० वर्षे) या विधवा मजूर महिलेच्या घराची भिंत अचानक कोसळली. दैव बलवत्तर म्हणून सदर महिला व तिची मुलगी बचावली. रोजच्या जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या सत्यभामाबाई यांच्यावर राहत्या घराच्या भिंतीसोबतच नवे संकट ही कोसळले आहे. शहरातील मोची गल्ली येथे दोन दिवसांपूर्वी घराची भिंत कोसळली. यात सत्यभामा परदेशी या वृद्ध विधवा मजूर महिलेचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. सत्यभामा यांचे पती राजकुमार यांचे १९७८ साली निधन झाले. तेव्हापासून दहा बाय दहाच्या एका जुन्या दगड मातीने तयार केलेल्या व सध्या मोडकळीस आलेल्या मोची गल्ली भागातील जीर्ण घरात सत्यभामा राजकुमार परदेशी (वय ७० वर्षे) या त्यांची मुलगी कविता यांच्या सोबत राहतात. आमच्या प्रतिनिधीने सदर दुर्घटना घडल्यानंतर श्रीमती सत्यभामा यांची भेट घेतली. घटनेची माहिती घेतली. नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी बोलताना सत्यभामा परदेशी यांनी त्या दिवशी घडलेला प्रसंग सांगितला. की, मंगळवार, दिनांक २ जानेवारी रोजी दुपारी नेहमीप्रमाणेच त्या व मुलगी कविता या दोघी त्यांच्या घरात होत्या. घराचे दार बंद होते. नेहमीची वेळ चुकवून गाय व बैलाने



मोठ मोठ्याने हंबरडा फोडला. गायीच्या हंबरण्याचा आवाज ऐकून मुलगी कविता ही गायीसाठी भाकर घेवून गेली. पण, गायीने भाकरीला स्पर्श केला नाही. आणि हंबरणे सुरूच ठेवले. तेव्हा मुलगी कविताने आईला आवाज देऊन घराबाहेर बोलावले. मुलीने बोलावताच सत्यभामाबाई या घराबाहेर गेल्या तोच अचानक भिंत कोसळली. अचानक झालेल्या या घटनेने माय-लेकीला काहीच कळेना, सुचेना. आर्थिक नुकसान तर मोठे झाले. पण, दैव बलवत्तर म्हणून की काय गायीमुळेच आपला जीव वाचला. असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी त्यांचे डोळे पाणावले होते. मी मिळेल ते काम करते. प्रसंगी मोलमजुरी करून कशी तरी आमची उपजिविका भागवत आहोत. आमच्या रोजच्या खाण्याची ही परवड आहे. जावाई सांभाळत नाही. म्हणून मुलगी कविता ही माहेरीच माझ्याकडे राहते. ती सतत आजारी असते. तिच्या दवाखान्याचा खर्च भागवताना मोठी कसरत करावी लागते. अशात घराची भिंत कोसळली. लाखों रूपयांच्या जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले. असे सत्यभामाबाई यांनी सांगितले. यावर्षी शहरात संततधार पाऊस पडला. त्यामुळे जुन्या भागातील मातीचे बांधकाम असलेल्या घराच्या भिंतीमध्ये पाणी जाऊन भिंत कोसळली. सत्यभामा यांच्या भिंतीची माती, दगड, विटांचा मलबा शेजारी असलेल्या विविध जीवनावश्यक वस्तूंवर पडल्याने त्याचे ही मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीचा प्रशासनाकडून त्वरित पंचनामा करून परदेशी यांना तातडीने आर्थिक मदत करावी, तसेच पंतप्रधान आवास योजना, मातोश्री रमाई आवास योजनेंतर्गत सत्यभामाबाई यांना अंबाजोगाई नगरपरिषद प्रशासनाने एखादे घरकुल मंजूर करावे आणि स्वयंसेवी, सेवाभावी संस्था, दानशूर व्यक्तींनी मदतीचा हात पुढे करावा अशी जनतेतून मागणी होत आहे.

## जिल्ह्यातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भरीव तरतूद करणार

### पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात शासनाने चंद्रपूर जिल्ह्यासाठी २६० कोटींचा नियतव्यय मंजूर केला असतांना जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून ३८० कोटी रुपये मंजूर करून आणण्यात यश आले. त्याप्रमाणे आगामी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासुध्दा हा आकडा ५०० कोटींच्या वर नेण्यासाठी आपण प्रयत्नशील असून जिल्ह्यातील पायाभूत सुविधांसाठी भरीव तरतूद करणार असल्याची ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

नियोजन सभागृह येथे पालकमंत्री मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. यावेळी अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. बैठकीला खासदार अशोक नेते, आमदार सुधाकर अडबाले, अभिजित वंजारी, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यपालन अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगावकर, सहायक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., जिल्हा नियोजन अधिकारी राजेश कळमकर यांच्यासह नियोजन समितीचे नवनिर्वाचित सदस्य उपस्थित होते. सन २०२३-२४ साठी शासनाच्या मंजूर नियतव्ययापेक्षा तब्बल १२० कोटींची वाढ जिल्ह्याच्या विकासासाठी करण्यात आली, असे सांगून पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, आगामी आर्थिक वर्षासाठी (सन२०२४-२५) सुध्दा जिल्ह्याला वाढीव निधी मिळण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये चर्चा करण्यात आली. यासाठी जिल्ह्यातील सर्व कार्यान्वयीन यंत्रणेकडून तब्बल ८१९ कोटी ८६ लक्ष रुपयांची मागणी नियोजन समितीकडे प्राप्त झाली आहे. या मागणीला अनुसरून जिल्ह्यातील पायाभूत सुविधांसाठी ५१७ कोटी ८६ लक्ष रुपयांची निधी मागणी प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. यात शिक्षण, आरोग्य, शेती, सिंचन, रोजगार या पंचसुत्रीवर विशेष भर देण्यात येणार असल्याचे पालकमंत्री मुनगंटीवार यांनी सांगितले.पुढे ते म्हणाले, नवीन अंगणवाडी बांधकामाचा



विषय अतिशय गांभिर्याने घेण्याची गरज असून यासाठी चांगले डिझाईन तयार करावे. तसेच अंगणवाडीमध्ये सर्व संगणकीय व्यवस्था, मॉनेटरिंग सिस्टीम, बांधकामाचा दर्जा उत्तम असणे गरजेचे आहे. सोबतच शौचालय, स्वच्छता गृह, भोजनकक्ष, संरक्षण भिंत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था याकडे विशेष लक्ष द्यावे. क्रीडांगण विकासासंदर्भात ग्रामपंचायतींकडून प्रस्ताव मागवावेत. प्रत्येक तालुक्यात अत्याधुनिक जीम तयार करून तेथे महिला आणि पुरुषांची स्वतंत्र व्यवस्था करावी. सदर काम सहा महिन्यात पूर्ण करण्यासाठी क्रीडा विभागाने लक्ष द्यावे. सोबतच वरोरा स्टेडीयमचे नुतणीकरण आणि चंद्रपूरचे तालुका स्टेडीयम घुग्घुसमध्ये करण्याचे नियोजन करावे.जिल्ह्यात सीसीटीव्ही बाबत पोलिस विभागाने चंद्रपूरचा स्वतंत्र प्लान तयार करावा. तसेच पब्लिक ड्रेस सिस्टीम, नाईट व्हिजन कॅमेरा यासंदर्भात सुक्ष्म आराखडा तयार करावा. नवीन पोलिस स्टेशन, स्मार्ट सिग्नल याबाबत नियमित पाठपुरावा करावा. जिल्ह्यातील खुल्या सार्वजनिक जागांचे संरक्षण करणे अतिशय महत्वाचे असून यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्ह्यातील सर्व खुल्या जमिनीभोवती संरक्षण भिंत बांधावी. त्यासाठी नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करावा. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय येथे महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत योजना व इतर आरोग्यविषयक योजनांची माहिती होण्यासाठी फलक लावावा, अशा सुचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी राजेश कळमकर यांनी सादरीकरण केले. बैठकीला विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .